॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

A Grade
NAAC Re-Accredited ( 3rd Cycle)

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

**विद्यार्थी विकास विभाग**

☎ 0257-2257418,419 FAX - 0257-2258403,406 Email- sw@nmu.ac.in Website- nmu.ac.in

जा.क्र.उमवि/14/विवि-78/245/2017 दि.08/09/2017

प्रति,

**विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांचे मा.प्राचार्य/मान्यता प्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा यांचे मा. संचालक/विभाग प्रमुख यांना -**

**विषय:- विद्यापीठस्तरीय संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धेच्या सहभागाबाबत.....**
**संदर्भ:-** विद्यापीठाचे पत्र क्र.उमवि/14/विवि-46/201/2017, दि.07/08/2017

महोदय / महोदया,

आपणास विदीतच आहे की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ संलग्न क्षेत्रात पदवी-पदव्युत्तर शिक्षण घेणा-या नियमित विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास व्हावा. या करीता विद्यापीठ प्राधिकरणाच्या निर्देशानुसार विद्यार्थी विकास विभागामार्फत त्यांच्यासाठी सातत्याने विविध स्पर्धा, कार्यशाळा, परिसंवाद, कृतीसत्रे, युवक महोत्सव, प्रदर्शन व मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केले जात असते.

याच पार्श्वभूमीवर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना संशोधन पध्दतीची ओळख, त्याचे सादरीकरण व मार्गदर्शन होण्यासाठी, त्यांच्या सादरीकरणात मुद्येसुदपणा व आकर्षकता यावी. या हेतूने विद्यापीठाच्या संलग्न क्षेत्रातील नियमित विद्यार्थासाठी संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धा **गुरुवार, दि. 28 सप्टेंबर 2017 रोजी विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री रोड, धुळे** येथे आयोजित करण्यात येत आहे.

## सादरीकरण स्पर्धेमागील भूमिका -

या स्पर्धेत उत्तर महाराष्ट्र विद्यापीठांतर्गत असणा-या महाविद्यालयातील कोणत्याही विद्याशाखेत प्रवेश घेतलेला विद्यार्थी प्रवेश घेऊ शकतो. यात त्याने आपल्या ज्ञान व संशोधनावर आधारीत त्यांच्या कार्यांचे या अभ्यासाचे सादरीकरण करणे अपेक्षीत आहे. विद्यार्थ्याने केलेले मुलभूत संशोधन त्याच्या पध्दती, संशोधनातील टप्पे हाती आलेले निष्कर्ष, संशोधनामुळे समाजाला होणारा फायदा आदी बाबी, त्यावेळी विद्यार्थ्यांनी सादर करावयाच्या आहेत. यात ते रोल मॉडेल, कार्डशिट, बॅनर, पोस्टर, नकाशे, चित्रे तसेच संगणक व संगणकीय सॉप्टवेअर (उदा. पावर पॉइंट प्रेझेंटेशन, मायक्रोसॉप्ट वर्ड, पीडीएफ फोटोशॉप) याचा वापर करु शकतील. विद्यार्थ्यांनी केलेले सादरीकरण अधिक प्रभावी व्हावे हाच यामागील हेतू आहे.

प्रस्तुत सादरीकरण स्पर्धेसाठी निवडक विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार असल्यामुळे कृपया आपण आपल्या महाविद्यायातील शाखानिहाय जास्तीत जास्त 06 विद्यार्थ्यांना पाठवावे विद्यार्थी संशोधकाची निवड करतांना कृपया खालील सूचनांचे अवलोकन करावे.

1. एका महाविद्यालयातील एका विद्याशाखेतील जास्तीत जास्त 06 विद्यार्थी महाविद्यालयास पाठविता येतील. मात्र स्पर्धेसाठी पात्र असणारा विद्यार्थी हा त्या महाविद्यालयाचा नियमित विद्यार्थी असावा. व त्याच्या / तिच्याकडे महाविद्यालयाचे ओळखपत्रे असावे. कृपया तात्पुरता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धेत पाठवू (Provisional admission) नये.
2. सहभागी होणा-या विद्यार्थ्याने एखाद्या क्षेत्रात स्वत:चे संशोधन केलेले असावे. त्याचे संशोधन विस्तृत नसले तरीही चालेल. मात्र ते मुलभूत असले पाहिजे. माहिती गोळा करुन त्याच्या निष्कर्षाकरुन आधारीत असावे.
3. संशोधकाचे सादरीकरण करतांना या स्पर्धेमागील भुमीकेनुसार त्यांनी सादरीकरणासाठी गरजेनुसार पध्दत निवडावी व त्यानुसार आवश्यक त्या तयारीनुसार स्पर्धेसाठी उपस्थित रहावे.
4. स्पर्धेपुर्वी संशोधकाच्या सादरीकरणाची आवश्यकता व महत्व या विषयावर काही मान्यवरांचे मार्गदर्शन होणार असून त्यातुन विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी मदत होईल.
5. स्पर्धेच्या अनुषंगाने उत्कृष्ट ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक प्रदान करण्यात येईल.

कृपया, उपरोक्त निकषानुसार विद्यापीठस्तरीय संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांची अल्पोपहार, व भोजनव्यवस्था आयोजक महाविद्यालयामार्फत करण्यात आली आहे. मात्र त्याचा प्रवास खर्च विद्यार्थी प्रवास सवलत दराने संबंधित महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास निधीतून करावी. तसेच निवड केलेल्या विद्यार्थ्यांनी दिलेल्या सुचनांचे तंतोतंत पालन व पुर्तता करण्याविषयी निर्देश द्यावेत.

- विद्यापीठस्तरीय संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धा उदघाटन सोहळा गुरुवार दि. 28 सप्टेंबर 2017 रोजी सकाळी 09.00 वा होईल.
- सहभागी विद्यार्थ्यांने सादरीकरणाच्या अनुषंगाने आवश्यक बाबी, उपकरणे, साहित्य सोबत आणावे.
- स्पर्धेत सहभागी विद्यार्थ्यांच्या माहीती बाबत आक्षेप प्राप्त झाल्यास आवश्यक पडताळणी नंतर तो आक्षेप सिध्द झाल्यास अशा विद्यार्थ्यांचे शिफारस करणा-या महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्था व शैक्षणिक प्रशाळा-विभाग यांच्यावर कार्यवाही करण्यात येईल.
- संशोधन प्रकल्प विद्यार्थ्यांनी सोबत घेवून येतांना त्यांच्या महाविद्यालयातील प्राचार्यांच्या स्वाक्षरी वा संमतीसह असावा.
- विद्यार्थ्याने स्पर्धेसाठी आणलेल्या संशोधन प्रकल्पासोबत स्वत:चे हमी पत्र सोबत आणावे. यामध्ये संशोधन हे माझे स्वत:चे हमी पत्रात उल्लेख असावा.

**अधिक माहिती व संपर्कासाठी संपर्क दुरध्वनी क्रमांक :-**

1) डॉ. सुहास जोशी - विद्यार्थी विकास अधिकारी - 9518754274
2) डॉ. योगेश पाटील - संयोजक - 9403341652
3) डॉ. सुनील अमृतकर - सह संयोजक- 7588736461
4) कार्यालय फोन -02562-276522

आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठस्तरीय स्पर्धेचे आयोजन व नियोजन करणे सोईचे व्हावे यादृष्टीने आपण निवड केलेल्या विद्यार्थ्यांची नावे मा. प्राचार्याच्या सही शिक्यानिशी महाविद्यालयाच्या लेटरहेडवर **सोमवार 25 सप्टेंबर 2017 पर्यंत मा. प्राचार्य, विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय साक्री रोड, धुळे-424001 दुरध्वनी क्र.02562-276522** यांच्याकडे **email-** dryogeshgpatil@gmail.com वर पाठवावे व सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सुचनेप्रमाणे स्पर्धेस्थळी तयारी निशी पाठवावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा. एस. टी. इंगळे)
**प्र. संचालक, विद्यार्थी विकास**

* सोबत :- विद्यार्थी स्वयंवृत्त

* प्रत माहितीसाठी :-

1) मा. प्राचार्य, विद्यावर्धिनी सभेचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे
2) प्रा. डॉ. जी. बी. चौधरी, अभय युवा कल्याण केंद्र संचलित कला महिला महाविद्यालय, धुळे
3) मा. वित्त व लेखा अधिकारी, उ.म.वि., जळगाव.
4) स्वीय सहाय्यक, मा. कुलगुरु कार्यालय, उ.म.वि., जळगाव.
5) मा. विभाग प्रमुख, उत्तमविद्या अंक, जनसंवाद पत्रकारिता विभाग, उ.म.वि., जळगाव.
6) मा.जनसंपर्क अधिकारी, उ.म.वि., जळगाव.
7) मा. पध्दती विश्लेषक, संगणक शास्त्र प्रशाळा, उ.म.वि., जळगाव.

D:\Sanshodhan Prakalp Sadarikaran Spardha 2017-18/2017

पासपोर्ट
साईज रंगीत
फोटो

## विद्यार्थी स्वयंवृत्त

## विद्यापीठस्तरीय संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धा

1) नाव :- -----------------------------------------------------------------------------

( आडनाव ) ( स्वत: चे नाव ) ( वडील / पतीचे नाव )

जन्म तारीख : - / / वय : -

2) महाविद्यालयाचे नांव-:----------------------------------------

3) पत्रव्यवहाराचा पत्ता-: ----------------------------------------

----------------------------------------

मोबा. Email:-------------------

4) जात / पोटजात -: ------------------ संवर्ग - स्त्री / पुरुष : --------------

5) प्रवेशित वर्ग -: ----------------- स्पेशल विषय : - ----------------

6) शैक्षणिक अर्हता -:

| अ.क्र. | शैक्षणिक व इतर गुणवत्ता तपशील | पदवीची विद्याशाखा | मिळालेले गुण | टक्केवारी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |

7) संशोधन कार्यातील सहभाग -: ---------------------------------------------------

8) संशोधन कार्यात प्राविण्य -: ---------------------------------------------------

दिनांक -: / /

( ----------------------- )
विद्यार्थी / विद्यार्थीनी स्वाक्षरी

---

**: - शिफारस पत्र :-**

प्रमाणित करण्यात येते की, विद्यार्थी/विद्यार्थीनी नामे ---------------------------------------------------- हा / ही आमच्या महाविद्यालयात नियमित शिक्षण घेत असून त्याने / तीने अर्जात नमूद केलेली माहिती पूर्णपणे बरोबर आहे. प्रस्तुत विद्यार्थ्याने संशोधन प्रकल्प सादरीकरण स्पर्धेत यापूर्वी सहभाग घेतलेला नाही. विद्यार्थ्याची गुणवत्ता व अंगर्भूत कौशल्याचा आधारावर त्याला / तीला स्पर्धेसाठी शिफारस करण्यात येत आहे.

विद्यार्थी विकास अधिकारी
नाव व सही

प्राचार्य/संचालक
सही व शिक्का